८५२२
जा.क्र.पणन-५/कृउबास/बा.फी,दे.फ./परिपत्रक/२०१६.
पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-४११००१.
दि. २८ नोव्हेंबर, २०१६.

**-: परिपत्रक :-**

**वाचले :- शासन अधिसुचना क्रमांक कृबास १२११/प्र.क्र.५२५/११-स,दि. २९ नोव्हेंबर, २०१४.**

शासन अधिसुचना क्रमांक कृबास १२११/प्र.क्र.५२५/११-स, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ अन्वये महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार कापुस खरेदी योजने अंतर्गत कापुस खरेदीसाठी कृषि उत्पन्न बाजार समित्यांना बाजार फी १०० रुपयास किमान ५० पैसे व कमाल १ रुपया या मर्यादेत व देखरेख फी प्रति १०० रुपयास ५ पैसे प्रमाणे आकारण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

बाजार फी व देखरेख फी ठरविण्याचे अधिकार महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासनास आहेत. शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार कोणत्याही बाजार समितीला नाही. अशाप्रकारची कोणतीही शासनाची पुर्वपरवानगी न घेता काही बाजार समित्या शासनाने ठरविलेल्या दरापेक्षा कमी दराने बाजार फी व देखरेख फी वसुल करीत असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आलेले आहे. बाजार समित्यांची सदरची कृती अत्यंत बेकायदेशिर व नियमांचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे बाजार समितीचे व कृषि पणन मंडळाचे नुकसान होत आहे.भविष्यात त्याचा परिणाम बाजार समितीच्या कामकाजावर होणार आहे.

राज्यातील काही बाजार समित्या समित्या शासनाने निश्चित केलेल्या दराचे उल्लंघन करुन कमी दराने बाजार फी व देखरेख फी वसुल करीत असल्याने राज्यातील सर्व बाजार समित्यांना सुचित करण्यांत येते की, शासनाने ठरविलेल्या दरापेक्ष कमी दराने बाजार फी व देखरेख फी वसुल करण्यात येवू नये. तसेच यापुर्वी कमी दराने वसुल केलेली असल्यास फरकाची रक्कम संबंधीतांकडून तात्काळ वसुल करण्यात यावी. व याबाबतचा संपुर्ण वस्तुस्थितीदर्शक अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा. अन्यथ: याबाबत बाजार समितीचे सभापती, सचिव, व संचालक मंडळास व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येवून पुढील कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रकान्वये दिलेल्या सुचना राज्यातील सर्व बाजार समित्या व खाजगी बाजारांना लागु राहतील.

**(डॉ.किशोर तोष्णीवाल)**
**पणन संचालक,**
**महाराष्ट्र राज्य,पुणे.**

प्रति- **१) सभापती/ सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व )**
**२) प्रवर्तक, खाजगी बाजार ( सर्व )**
**३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था ( सर्व )**